जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



दैनिक | वर्ष १ | अंक १७७ | रविवार, १८ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


संक्षिप्त

### देवाच्या मनात असेल तर तेही होईल : ठाकरे

**मुंबई, ता. १७ :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील यशावर समाधान व्यक्त केले असले, तरी बहुमताचा आकडा गाठता न आल्याबद्दल खंत व्यक्त केली. मुंबईचा महापौर शिवसेनेचाच व्हावा ही इच्छा आजही कायम आहे, देवाच्या मनात असेल तर तेही होईल, असे म्हणत त्यांनी भाजप आणि शिंदे गटावर जोरदार टीका केली. शिवाजी पार्कवरील सभांना होणारी गर्दी आणि प्रत्यक्ष मतदान यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी निवडणूक प्रक्रियेवर शंका घेतली. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता, साम-दाम-दंड-भेद वापरून निवडणुका लढवल्या गेल्याचा आरोप केला. गद्दारांना मुंबईकर माफ करणार नाहीत, असेही ठाकरे यावेळी म्हणाले. भाजपने कागदावर शिवसेना संपवण्याचा प्रयत्न केला असला, तरी जमिनीवरची शिवसेना ते कधीच संपवू शकणार नाहीत, असेही ठाकरे म्हणाले.

# जिल्हा परिषदेचे बिगुल वाजल्याने गावोगावी पुन्हा उत्साह

## पूर्व हवेलीत गट- गणांमध्ये राजकीय बांधणीला वेग

हनुमंत चिकणे

उरुळी कांचन, ता. १७ : पुणे पालिका आणि महापालिकांपाठोपाठ जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे बिगुल वाजल्याने ग्रामीण भागात सर्वच पक्षांच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत, तर अनपेक्षित घडामोडींमुळे गावोगावच्या वातावरणात पुन्हा राजकीय खळबळ निर्माण होण्याचे दिवस येत आहेत.



या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप या महायुतीतील दोन मित्र पक्षात काट्यांची टक्कर पाहावयास मिळणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्या ताब्यात असलेल्या शिरूर हवेलीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकहाती सत्तेला सुरुंग लावण्यासाठी भारतीय जनता पक्षासह सर्व विरोधक कामाला लागले आहेत. पूर्व हवेलीत जिल्हा परिषदेचे चार आणि पंचायत समितीचे आठ गण असून, मागील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ७ भाजप- ३, शिवसेना- २, अपक्ष - १ असे पक्षीय बलाबल राहिले आहे.

पूर्व हवेलीतील सोरतापवाडी गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकजिल्हाध्यक्ष आण्णा महाडिक, भाजपचे नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांच्यात काटे की टक्कर होईल असे सध्या परिसरात चित्र आहे. तर याच गणात अनेकांनी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष या सर्वच पक्षांनी संघटनात्मक बांधणी, निवडणुकीची रणनीती आखण्यास सुरुवात केली असून, नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली संवाद बैठकावर भर दिला आहे. दुसरीकडे इच्छुकांची भाऊगर्दी दिसत असून, इच्छुकांनी नेतेमंडळी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधून मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

शिरूर हवेलीचे आमदार माऊली कटके, माजी आमदार अशोक पवार यांच्या भूमिकेकडे दोन्ही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे. दोन्ही राष्ट्रवादी एक झाली तर पूर्व हवेलीतील जिल्हा परिषदेच्या ४ पैकी ४ जागेवर सत्ता एकहाती मिळवण्यासाठी दोन्ही आजी माजी आमदारांना लक्ष द्यावे लागणार आहे. निवडणुकीची आचार संहिता लागण्यापूर्वीच चारही जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांचे मेळावे घेऊन चार-झिरो करण्यासाठी कार्यकर्त्यांना जोमाने कामाला लागण्याचा संदेश दिले आहेत. ग्रामीण भागात पक्षाची पकड मजबूत करून योग्य उमेदवार निश्चितीवर त्यांचा भर राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समितीवर वर्चस्व मिळविण्यासाठी भाजप साम, दाम, दंड, नीती वापरण्याच्या तयारीत आहे. पालिका निवडणुकीतील यशानंतर भाजप नेते, कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला असून भाजपचे उत्तर जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, दौंडचे आमदार राहुल कुल यांच्या मार्गदर्शनाखाली गट व गणनिहाय रणनीती आखण्यास सुरुवात केली.

दरम्यान, राष्ट्रवादीतील इच्छुक उमेदवरांना उमेदवारी मिळणार नाही अशा नाराजांवर भाजपाचेहि लक्ष असणार आहे. ग्रामीण भागातील ग्रामपंचायती व सहकारी संस्थांवर राष्ट्रवादी काँग्रेसची असलेली मजबूत पकड सैल करण्यात त्यांना कितपत यश येते, हे पाहणे औत्सुक्याचे आहे. या निवडणुकीत विशेषत: महिला व आरक्षित जागांवर उमेदवार निवडताना दोन्ही पक्षांचा कस लागणार आहे. पूर्व हवेलीतील गट आणि गण यांचे संभाव्य उमेदवार कोण याबाबत उत्सुकता दिसत आहे.

### पक्षीय बलाबल (२०१७)

जिल्हा परिषद– राष्ट्रवादी काँग्रेस : ७, भाजप– ३, शिवसेना– २, अपक्ष – १ पंचायत समिती– राष्ट्रवादी काँग्रेस : १३, शिवसेना– ७, भाजप– ४, अपक्ष : २.

### जिल्हा परिषद गट आरक्षण

उरुळी कांचन – सोरतापवाडी (अनुसूचित जाती), लोणी काळभोर– कदमवाकवस्ती अनुसूचित जाती महिला), थेऊर– आव्हाळवाडी (इतर मागास प्रवर्ग महिला), केसनंद– कोरेगावमूळ (सर्वसाधारण महिला).

### पंचायत समितीच्या गणांचे आरक्षण

लोणी काळभोर (मागास प्रवर्ग महिला), कदमवाकवस्ती (अनुसूचित जाती), थेऊर (सर्वसाधारण), केसनंद (सर्वसाधारण), कोरेगाव मूळ (सर्वसाधारण), आव्हाळवाडी (सर्वसाधारण महिला), उरुळी कांचन (अनुसूचित जाती महिला), सोरतापवाडी (नागरिकांचा मागास प्रवर्ग).

### लोणी काळभोर येथील रामा कृषी कंपनीतील कामगारांना प्रतिमाह १५ हजार पगारवाढ

**लोणी काळभोर, ता. १७ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील रामा कृषी रसायन लिमिटेड कंपनीत काम करणाऱ्या कामगारांसाठी एक आनंदाची बातमी आहे. रामा कृषी रसायन कंपनी मॅनेजमेंट व रमाकृषी कामगार युनियन यांच्या मध्ये त्रैमासिक करार नुकताच झाला आहे. या करारानुसार सन २०२४ ते २०२७ या तीन वर्षासाठी कामगारांना प्रतिमाह १५ हजार २०१ रुपये पगारवाढ झाली आहे.

रामा कृषी कंपनीच्या मॅनेजमेंटच्या वतीने जनरल मॅनेजर व्ही केपांडे, पर्सनल मॅनेजर आर. एन शर्मा, भंडारी तर युनियनच्यावतीने युनियनचे अध्यक्ष राजीव काळभोर, सचिव दत्तात्रय काळे, उपाध्यक्ष आकाश गरगडे, दत्तात्रय वारघडे, दत्तात्रय सुक्रे, गजानन जाधव यांच्यात एक बैठक झाली.

या बैठकीत वरील निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. आणि या करारावर स्वाक्षरी करून मंजूर करण्यात आला. आता कामगारांना प्रतिमाह भरघोस पगारवाढ झाल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# शिरूर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची तयारी पूर्ण

## ३३७ मतदान केंद्रे, एकही केंद्र संवेदनशील नाही

योगेश मारणे

शिरूर, ता. १७ : शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून, निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व नियोजन करण्यात आले आहे. शिरूर तालुक्यात एकूण जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण असून, यासाठी मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे तालुक्यातील एकही मतदान केंद्र संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील नसल्याची माहिती निवडणूक प्रशासनाने दिली आहे.



निवडणूक कार्यक्रमानुसार १६ ते २१ जानेवारी (दुपारी वाजेपर्यंत) उमेदवारी अर्ज सादर करता येणार आहेत. २२ जानेवारी रोजी अर्जांची छाननी होईल, तर २३, २४ व २५ जानेवारी या कालावधीत अर्ज माघारी घेता येतील. २७जानेवारी रोजी उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष मतदान ५ फेब्रुवारी रोजी होणार असून, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी २ हजार १९० अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ आवश्यक असून ते पुरेसे उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच राखीव धरून एकूण ३५ सेक्टर ऑफिसर नियुक्त करण्यात आले असून, त्यांच्यासाठी स्वतंत्र वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मतदान कर्मचाऱ्यांसाठी व इतर यंत्रणांसाठी ५३ ते ५५ एस.टी. बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रे सुस्थितीत असून अपंग व वृद्ध मतदारांसाठी आवश्यक सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उमेदवारांना विविध परवानग्यांसाठी शिरूर तहसील कार्यालयात एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर मोबाईल वापरास पूर्णतः बंदी घालण्यात आली असून, यासाठी विशेष तपासणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन केले जाईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, खर्च मर्यादेबाबत जिल्हा परिषद उमेदवारांसाठी ९ लाख रुपये, तर पंचायत समिती उमेदवारांसाठी ६ लाख रुपये इतकी खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असली तरी पहिल्या दोन दिवसांत एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही, अशी माहिती शिरूरचे निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी दिली. निवडणुकीनंतर मतमोजणी रांजणगाव एमआयडीसी येथील राज्य वखार महामंडळाच्या गोडाऊन क्रमांक २ येथे पार पडणार आहे.

### पिंपरीत वाटपासाठी घड्याळे नेणारा टेम्पो ताब्यात

**पिंपरी, ता. १७ :** मतदारांना वाटप करण्यासाठी भिंतीवरील घड्याळे घेऊन जाणाऱ्या एका टेंपोवर पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई वाकड येथील म्हातोबानगर, सदगुरू कॉलनी येथे करण्यात आली.

संतोषसरवदे (रा. काळाखडक, वाकड, मूळ- सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी प्रतीक कांबळे (रा. पिंपरीगाव) यांनी वाकड पोलिस ठाण्यात दिली आहे. आरोपी त्याच्या टेम्पोतून ४० हजार रुपये किमतीची घड्याळे घेऊन जात होता. ही घड्याळे महापालिका प्रभाग क्रमांक २५ मधील एका अज्ञात उमेदवाराच्या सांगण्यावरून मतदारांना वाटण्यासाठी नेली जात असल्याचे समोर आले. या प्रकरणी वाकड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून टेम्पो आणि घड्याळे जप्त केली आहेत.

# पल्लवी काकडे, संग्राम कोतवाल यांच्या गावभेट दौऱ्याला प्रतिसाद

**लोणी काळभोर, ता. १७ :** थेऊर जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार पल्लवी युवराज काकडे व पंचायत समिती गणचे उमेदवार संग्राम मच्छिंद्र कोतवाल यांच्या संयुक्त गावभेट दौऱ्याला कुंजीरवाडीत ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. गावात दाखल होताच कार्यकर्ते, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी फुलहार घालून तसेच घोषणा देत दोन्ही उमेदवारांचे जल्लोषात स्वागत केले.



या वेळी उमेदवारांनी घराघरांत भेटी देत ग्रामस्थांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेतल्या. पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण तसेच युवकांसाठी रोजगाराच्या संधी या विषयांवर ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषद स्तरावर विकासकामांना प्राधान्य देत पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याचा निर्धार सौ. पल्लवी काकडे यांनी व्यक्त केला. तर पंचायत समितीच्या माध्यमातून गावकेंद्रित आणि सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध असल्याचे संग्राम कोतवाल यांनी सांगितले.

ग्रामस्थांनीही दोन्ही उमेदवारांवर विश्वास व्यक्त करत विकासाच्या वाटचालीसाठी त्यांना साथ देण्याची ग्वाही दिली. या गाठीभेट दौऱ्यामुळे कुंजीरवाडीत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांमध्ये व नागरिकांमध्ये उत्साह वाढल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# टीईटी अंतरिम निकालात वाढ; पात्र उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता

**पुणे, ता. १७ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) अंतरिम निकाल जाहीर करण्यात आला असून, यंदा निकालाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदाच्या परीक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ नोव्हेंबर रोजी राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर टीईटी परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेची अंतरिम उत्तरसूची १९ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर प्रश्नपत्रिकेतील प्रश्न किंवा पर्यायी उत्तरांबाबत २७ डिसेंबरपर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते. प्राप्त आक्षेपांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन १३ जानेवारी रोजी अंतिम उत्तरसूची जाहीर करण्यात आली. त्यानंतर आता अंतरिम निकाल प्रसिद्ध करण्यात आला आहे.

हा अंतरिम निकाल उमेदवारांच्या लॉगिनमध्ये ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. निकालाबाबत आक्षेप किंवा त्रुटी असल्यास २१ जानेवारीपर्यंत उमेदवारांना त्यांच्या लॉगिनद्वारेच आक्षेप नोंदवता येणार आहेत. अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचे परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच टीईटी अनिवार्यतेबाबत दिलेल्या निर्णयानंतर यंदा टीईटी परीक्षेसाठी नोंदणीमध्ये वाढ झाली. यंदा एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी नोंदणी केली असून, त्यापैकी २ लाख ३ हजार ३३४ उमेदवारांनी पेपर क्रमांक १ साठी, तर २ लाख ७२ हजार ३३५ उमेदवारांनी पेपर क्रमांक २ साठी नोंदणी केली आहे. राज्य परीक्षा परिषदेने २०१३ पासून आतापर्यंत आठ वेळा टीईटी परीक्षा घेतली असून, २९ लाख ७४ हजार ६०० उमेदवारांपैकी केवळ १ लाख ६ हजार ६६३ उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यामुळे टीईटीचा सरासरी निकाल सुमारे ३.५ टक्के इतका आहे. आतापर्यंत सर्वाधिक निकाल २०१८ मध्ये ५.१३ टक्के, तर २०१२-१३ मध्ये ५.०२ टक्के लागला होता. उर्वरित वर्षांतील निकाल २.३ ते ३.७० टक्क्यांदरम्यान राहिला आहे. तसेच २०१८ आणि २०१९ मधील परीक्षांतील गैरप्रकारांप्रकरणी ९ हजार ५३७ उमेदवारांची पात्रता रद्द करण्यात आली आहे. यंदाच्या टीईटी परीक्षेचा अंतरिम निकाल वाढलेला असून, प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार करून अंतिम निकाल येत्या काही दिवसांत जाहीर करण्यात येणार असल्याचे आयुक्त अनुराधा ओक यांनी सांगितले.

# प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा जन्मदिवस ज्ञान शिदोरी दिन म्हणून साजरा

**लोणी काळभोर, ता. १७ :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील ४११ शाखांमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा जन्मदिवस ज्ञान शिदोरी दिन म्हणून साजरा केला जातो. या उपक्रमाअंतर्गत प्राध्यापकांकडून संकलित केलेली पुस्तके विद्यार्थ्यांना भेट म्हणून दिली जातात. ज्ञानाची देवाण-घेवाण व्हावी तसेच विद्यार्थ्यांची वाचनसंस्कृती वाढावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते प्रा. पोपट चंद यांनी केले.



प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा ८१ वा वाढदिवस १७ जानेवारी २०२६ रोजी लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. पोपट चंद म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केवळ धार्मिक न राहता अध्यात्मिक बनावे. अध्यात्मातून मानवी मनाचा विकास होतो आणि संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व घडते. प्रत्यक्ष ज्ञान, अनुमानित ज्ञान आणि शब्दज्ञान अशा विविध प्रकारच्या ज्ञानाची ओळख करून घेत विद्यार्थ्यांनी अपार ज्ञानाबरोबरच पार ज्ञानी बनावे, असे त्यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी सांगितले की, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी लावलेल्या शिक्षणरूपी वटवृक्षाच्या शाखा वाढवण्याचे व जोपासण्याचे कार्य संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे करत आहेत. त्यांच्या हयातीतच जन्मदिवस ज्ञान शिदोरी दिन म्हणून साजरा होणे, हे विद्यार्थ्यांसह शिक्षक व कार्यकर्त्यांचे सौभाग्य आहे. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हे संस्थेचे ब्रीदवाक्य असून विद्यार्थी ज्ञानासोबत सुसंस्कारी घडावा, हा प्राचार्य साळुंखे यांचा आग्रह असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, ग्रंथालय व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयात व्याख्यान व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रा. पोपट चंद यांच्या हस्ते वाचन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वाचन कक्षात विविध तत्त्वज्ञान, चालू घडामोडी व मासिकांचे वाचन करून ज्ञानसंपन्न व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. ग्रंथ प्रदर्शनासाठी ग्रंथपाल प्रा. निलीमा हेमाडे यांचे मोलाचे योगदान लाभले.

या कार्यक्रमास प्रा. सतीश कुदळे, डॉ. संभाजी निकम, डॉ. स्नेहा बुरगुल, डॉ. शेखर पाटील, प्रा. मुकेश महाले, प्रा. सिद्धारुढ ऐवळे, प्रा. गणेश गाडेकर, प्रा. गीतांजली चव्हाण, प्रा. निशिगंधा पाटील यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. विजयकुमार घोडके यांनी मानले.

## संक्षिप्त



### जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत राष्ट्रवादी एकत्र लढणार

**बारामती, ता. १७ :** कृषी २०२६ प्रदर्शनाच्या निमित्ताने दोन्ही राष्ट्रवादीतील प्रमुख नेते शनिवारी बारामतीत आहेत. या नेते मंडळींनी एकत्रितपणे कृषी प्रदर्शनाचे उद्धाटन केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी एकत्रितपणे लढणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. राज्यातील महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींना जोरदार झटका बसल्यानंतर शनिवारी बारामतीत ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्याकडे महत्त्वाची बैठक पार पडली या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, आमदार रोहित पवार आदींची उपस्थिती होती. कृषी प्रदर्शनाच्या पाहणीनंतर या नेत्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक एकत्र लढणार असल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर बारामतीत शरद पवार उपमुख्यमंत्री अजित पवार व अन्य नेते मंडळींची महत्त्वाची पत्रकार परिषद सुद्धा पार पडत आहे.

### निवडणुकीत पराभूत झाल्याने धमकी; भाजप उमेदवाराच्या समर्थकांविरुद्ध गुन्हा

**पुणे, ता. १७ :** महापालिका निवडणुकीत पराभूत झाल्याने भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराच्या समर्थकांनी तरुण, तसेच त्याच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करुन धमकी दिल्याची घटना भवानी पेठेत घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एकाने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिकेच्या भवानी पेठ-कासेवाडी प्रभागातून तक्रारदाराचे चुलतभाऊ भारतीय जनता पक्षाचे उमेदवार पराभूत झाले. तक्रारदाराच्या कुटुंबाने विरोधात प्रचार केल्याने त्यांचा पराभव झाला, असे वाटल्याने आरोपी शुक्रवारी तक्रारदाराच्या घरात शिरले. तक्रारदार आणि त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करुन धमकी दिली, असे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलीस निरीक्षक हर्षल कदम तपास करत आहेत.दरम्यान, प्रतिस्पर्धी उमेदवाराला समर्थन दिल्याने महिलेसह तिच्या कुटुंबीयांना धमकाविण्यात आले.

### कोंढव्यात महिलेचा विनयभंग करणाऱ्या एकाविरुद्ध गुन्हा

**कोंढवा, ता. १७ :** मुलीची छेड काढल्याने विचारणा करणाऱ्या महिलेला धक्काबुक्की करुन तिचा विनयभंग करण्यात आल्याची घटना कोंढव्यातील येवलेवाडी परिसरात घडली. या प्रकरणी एकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने येवलेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, वैभव घाटोळे (रा. टिळेकनगर, कोंढवा बुद्रुक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेच्या दोन मुलींकडे पाहून आरोपी घाटोळे शिट्टी वाजवायचा. महिलेने त्याला जाब विचारला. तेव्हा त्याने महिलेला धक्काबुक्की करुन विनयभंग केला. पोलीस उपनिरीक्षक प्रसाद जाधव तपास करत आहेत.

### खचू नका, नव्या जोमाने कामाला लागा; अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सल्ला

**पुणे, ता. १७ :** नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपला मिळालेल्या यशाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अंदाज चुकल्याची कबुली त्यांनी दिली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या बालेकिल्ल्यात पक्षाला अपेक्षित यश मिळाले नसले, तरी पराभवाने खचून न जाता कार्यकर्त्यांनी पुन्हा जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. आगामी जिल्हा परिषद निवडणुकांचे निर्णय स्थानिक पदाधिकारी घेतील, असे स्पष्ट करतानाच त्यांनी महायुतीमधील सहकार्य कायम असल्याचे सांगितले. दरम्यान, पवार कुटुंब कौटुंबिक स्तरावर नेहमी एकत्रच असेल, असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

### मतदान केंद्रात मोबाईल नेणाऱ्या महिलेवर गुन्हा

**पिंपरी, ता. १७ :** मतदान केंद्रात मोबाईल बाळगण्यास मनाई असतानाही स्वतः जवळ मोबाईल बाळगणाऱ्या आणि बॅलेट युनिटचे फोटो काढणाऱ्या एका महिलेवर पिंपरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार चिंचवड, मोहननगर येथील लीलाबाई खिंवसरा विद्यालयातील मतदान केंद्रात घडला. या प्रकरणी रमेश कांबळे (रा. थेरगाव) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदान केंद्रावर मोबाईल नेण्यास मनाई आहे. तरीही, महिला आरोपीने मतदान केंद्र परिसर क्षेत्रात मोबाईल नेला आणि बॅलेट युनिटचे फोटो काढले. ही बाब लक्षात आल्यानंतर निवडणूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला.

# महाविजय स्वाभिमानी पिंपरी–चिंचवडकरांना समर्पित

## भोसरीचे आमदार महेश लांडगे यांची भावूक प्रतिक्रिया

**पिंपरी-चिंचवड, ता. १७ :** पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेच्या निकालांकडे पाहता, पिंपरी-चिंचवडकरांनी पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीवर ठाम विश्वास व्यक्त केला असून, भाजपचा एकहाती महापौर बसवण्याचा मार्ग मोकळा झाला. स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना आम्ही साद घातली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व आणि भारतीय जनता पार्टीच्या पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली मिळालेला हा महाविजय स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना समर्पित आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक- २०२६ च्या निमित्ताने राजकीय वातावरण तापले होते. मागील काही दिवसांपासून शहरात प्रचाराची जोरदार रणधुमाळी सुरू होती. आज निकालावरुन पिंपरी-चिंचवडची जाणती व स्वाभिमानी जनता भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिल्याचे स्पष्ट होत आहे.



या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला १२८ पैकी ८४ जागांवर विजय मिळाला आहे. प्रमुख प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला ३७, शिवसेना शिंदे गटाला ६ आणि अपक्ष १ असे संख्याबळ आहे. भाजपा आणि शिंदे गट युती झाल्यास भाजपा महायुतीने ९१ जागांवर विजय मिळवल्याचे स्पष्ट होते.


यावेळी बोलताना आमदार महेश लांडगे म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे सक्षम, दूरदर्शी नेतृत्व माननीय देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवत पिंपरी-चिंचवडकरांनी भारतीय जनता पार्टीला स्पष्ट आणि निर्णायक कौल दिला आहे. हा कौल म्हणजे विकासकामांना, प्रामाणिक प्रशासनाला आणि जनहिताला दिलेली ठाम पोचपावती आहे. हा विजय केवळ भारतीय जनता पार्टीचा नाही, तर हा विजय पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक स्वाभिमानी नागरिकाचा आहे.

### भाजपा कार्यकर्त्यांचे मानले आभार

तसेच पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने, पदाधिकाऱ्याने आणि नेत्यांनी प्रामाणिकपणे केलेल्या मेहनतीचा हा सन्मान आहे. घराघरात जाऊन केलेला संवाद, लोकांशी निर्माण केलेला विश्वास आणि संघटनात्मक ताकदीमुळेच आज हे यश शक्य झाले आहे. पिंपरी–चिंचवड शहराच्या सर्वांगीण, नियोजित आणि शाश्वत विकासासाठी भारतीय जनता पार्टी पूर्णतः कटिबद्ध असून, नागरिकांनी दाखवलेला हा विश्वास अधिक जबाबदारीने जपला जाईल. महानगरपालिकेच्या माध्यमातून विकासकामांचा वेग वाढवून पिंपरी–चिंचवडला देशातील आदर्श शहर बनवण्याचा संकल्प भाजप निश्चितपणे पूर्ण करेल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

> ‘ विकासाभिमूख हिंदुत्वाच्या मुद्यावर आम्ही ही निवडणूक लढवली. स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकर भारतीय जनता पार्टीच्या पाठिशी बहुमताने राहिला आहे. विरोधकांनी केलेल्या बिनबुडाच्या आरोपांना ही चपराक आहे. आगामी काळात शहराच्या शाश्वत विकासासाठी मुख्मंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली समर्पित भावनेतून काम करण्यासाठी मी व माझे सहकारी कटिबद्ध आहोत. या निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकर म्हणून एकजुटीने काम करण्याचे आवाहन करतो.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

तसेच, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप, विधान परिषद आमदार उमा खापरे, विधान परिषद आमदार अमित गोरखे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, नेते आणि मार्गदर्शक यांच्यासह भाजपा परिवारातील विविध संस्था, संघटना यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा महाविजय शक्य झाला. या विचारांच्या आणि विकासाच्या लढाईमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान दिलेल्या प्रत्येकाचा मी ऋणी आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.



# शिरूर तालुक्यात राजकीय हालचालींना वेग

## मोठ्या नेत्याच्या भाजप प्रवेशाची जोरदार चर्चा

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. १७ : शिरूर तालुक्यातील एका प्रभावी व मोठ्या नेत्याचा लवकरच भारतीय जनता पक्षात प्रवेश होणार असल्याची जोरदार चर्चा सध्या वाऱ्यासारखी पसरली असून, त्यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नेमका तो नेता कोण, याबाबत गावोगावी, चौकाचौकात तसेच राजकीय बैठकांमध्ये विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

दरम्यान, शिरूर तालुक्यातील अनेक ज्वलंत प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. बंद पडलेला रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू होणार कधी, चासकमान धरणाच्या पाण्याच्या आवर्तनाचा व कालव्यांच्या अस्तरीकरणाचा प्रश्न केव्हा मार्गी लागणार, तसेच पुणेअहिल्यानगर महामार्गावरील वाढती वाहतूक कोंडी कशी सुटणार, यासह तालुक्यातील अनेक मूलभूत नागरी व ग्रामीण प्रश्न अद्यापही अनुत्तरितच आहेत.


या पार्श्वभूमीवर, तालुक्यातील महत्त्वाचे प्रश्न सोडवायचे असतील आणि राजकीय अस्तित्व टिकवायचे असेल, तर भाजपशिवाय पर्याय नाही, असा सूर आता उघडपणे ऐकू येऊ लागला आहे. सत्तेत असलेल्या पक्षाशी थेट संलग्न राहिल्यासच विकासकामांना व प्रलंबित प्रकल्पांना गती मिळू शकते, अशी भावना सर्वसामान्य जनतेतूनही व्यक्त होत आहे.

त्यामुळे संबंधित नेत्याचा भाजप प्रवेश हा केवळ पक्षांतर न राहता, तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा राजकीय निर्णय ठरू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या संभाव्य प्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलणार असल्यचे बोलले जात असताना, भाजपमध्ये प्रवेश करणारा तो नेता नेमका कोण, याबाबतची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे.

दरम्यान, पुढील काही दिवसांत या चर्चेला अधिकृत स्वरूप येते की त्या केवळ चर्चाच ठरतात, हे पाहणे आता शिरूर तालुक्याच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.

# महापौरपदाची आरक्षण सोडत जानेवारी अखेरीस होण्याची शक्यता

**मुंबई, ता. १७ :** राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल शुक्रवारी (ता. १७) जाहीर झाले. निकालानंतर आता राज्याच्या राजकारणावरील सत्ताधाऱ्यांचे वर्चस्व पुन्हा सिद्ध झाले. विशेषत: सत्ताधारी महायुतीचे नेतृत्व करणाऱ्या भाजपचे राजकीय स्थान आणखी भक्कम बनले. प्रमुख शहरांचा कारभार हाती येणार असल्याने महापालिका निवडणुकांना मोठे महत्व प्राप्त झाले. विशेष म्हणजे मुंबई महापालिकेच्या महापौरपदी पहिल्यांदाच भाजपचा महापौर बसणार आहे. मात्र आता महापौर कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



परंतु आरक्षण सोडत निघाल्यानंतरच महापौर पदाचा चेहरा ठरणार आहे. पुढील आठवड्यात नगर विकास खाते महापौर सोडत काढणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. तर जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे राज्यातील निवडणुकीच्या इतिहासात महापौर आरक्षणाची सोडत न होता निवडणूक होण्याची ही पहिलीच वेळ होती.

साधारणपणे महापालिका निवडणुकांपूर्वी किंवा प्रभाग रचनेदरम्यानच महापौरपदाचे आरक्षण जाहीर केले जाते. यामुळे कोणत्या प्रवर्गातील उमेदवाराला संधी मिळेल, हे स्पष्ट होत असे. मात्र, यावेळी अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. मात्र हे आरक्षण पडण्यासाठी किमान दोन ते तीन आठवड्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

महापौरपदासाठी सोडतमधून आरक्षण निश्चित केले जाते. सर्वसाधारण पुरूष किंवा महिला, ओबीसी, अनुसूचित जाती व जमती अशा क्रमाने आरक्षण सोडत काढली जाते. आधी जर सर्वसाधारण गटासाठी महापौरपद असल्यास पुढच्या वेळी म्हणजे आता तो गट वगळून अन्य प्रवर्गाला आरक्षण दिले जाते. जेणेकरून सर्व गटांना सर्वोच्चपद भूषविण्याची संधी मिळेल.

दरम्यान, महापौरपदाचे आरक्षण जाहीर न होण्यामागे ओबीसी आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयात असलेला तिढा हे कारण प्रशासनाकडून दिले जात आहे. जोपर्यंत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत आरक्षण निश्चित करणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. मात्र आता यावर लवकरच तोडगा निघण्याची शक्यता आहे.

# उरुळी कांचन येथील टपरीचालकावर गोळीबार; अज्ञात ६ ते ७ जणांवर गुन्हा

**उरुळी कांचन, ता. १७ :** हॉटेलच्या बाहेर मोबाईल फोनवर बोलत उभे राहिलेल्या उरुळी कांचन (ता. हवेली) येथील एका टपरीचालकावर दुचाकीवरून आलेल्या ६ ते ७ अज्ञातांनी कोयता, लाकडी दांडक्याने मारहाण करीत गोळीबार केल्याची घटना घडली आहे. शुक्रवारी (ता. १६) गुऱ्होळी (ता. पुरंदर) ग्रामपंचायत हद्दीतील वाघापुर-चौफुला रस्त्यावरील हॉटेल महाराजा परमीट रूम बीअरबार समोर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

कृष्णा बाबासाहेब हवलदार (वय २६, व्यवसाय - पानटपरी रा. उरूळी कांचन ता हवेली) असे मारहाण झालेल्या टपरीचालकाचे नाव आहे. याप्रकरणी कृष्णा हवलदार यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून त्यानुसार अज्ञात ६ ते ७ जणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा हवलदार हे उरुळी कांचन येथील रहिवासी असून त्यांची उरुळी कांचन बस स्थानक परिसरात जय शंकर नावाची पान टपरी आहे. शुक्रवारी (ता. १६) हवलदार त्यांचा मित्र संदिप देवराम हे दोघेजण जेजुरी वरून उरूळी कांचन येथे निघाले होते. यावेळी वाघापुर चौफुला चौकातील



हॉटेल महाराजा येथे जेवणासाठी थांबले होते. जेवण झाले नंतर संदिप हा बील देण्यासाठी गेला होता.

तर कृष्णा हवलदार यांना त्यांच्या आईचा फोन आला असल्याने फोनवर बोलत बाहेर आले होते. यावेळी उरूळी कांचन बाजुकडुन ३ दुचाकी मोटर सायकल वरून ६ ते ७ अनोळखी इसम आले. त्यांनी त्यांच्या गाडया रसत्याच्या पलीकडे उभ्या केल्या. त्यातील काहीच्या हातात लाकडी दांडकी व एकाचे हातात लोखंडी कोयता होता. यावेळी त्यातील एका मुलाने लाकडी दांडक्याने पाठीत व पायावर मारहाण करण्यास सुरुवात केली. तर हातात कोयता असेलल्या एका मुलाने डोक्यात डावे बाजुस वार केला त्यामुळे डोक्यातुन रक्त होऊ लागला.

याचवेळी रस्त्याचे पलीकडे मोटर सायकल जवळ उभे असलेले एका मुलाने त्याचे जवळील गावठी पिस्तुलाने एक गोळी हावेत फायर केली व दुसरी गोळी जिवे मारण्याचे उददेषाने कृष्णा हवलदार यांच्या दिषेन फायर केली. परंतु ती गोळी त्यांना लागली नाही. फायरींगचा आवाज ऐकून हॉटेल मधील कामगार आजुबाजुचे लोक बाहेर पळत आले. त्याचवेळी संदिप देवराम हाहि पळत आला. त्याला पाहून मारहाण करणारे व फायरींग करणारी मुले तेथुन पळुन गेले.

दरम्यान, डोक्यातून रक्तस्राव होत असल्याने संदिप देवराम याने त्याचे मोटर सायकलवरून उरूळी कांचन येथील सिध्दीविनायक हॉस्पिटल येथे उपचार दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. सदर ठिकाणी उरूळी कांचन पोलीस ठाण्यातील पोलीस आले होते त्यांना घडला प्रकार सांगीतला. या घटनेची माहिती सासवड पोलिसांना देण्यात आली त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी सासवड पोलीस ठाण्यात अज्ञात ६ ते ७ जणांच्या विरोधात तक्रार देण्यात आली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनवणे करीत आहेत.

# औषध वितरकांची कोट्यवधींचा फसवणूक; पुण्याच्या महिलेचा मास्टरमाइंड प्लॅन उघड

**पुणे, ता. १७ :** पुणे शहरातील सदाशिव पेठ परिसरात एका नामांकित औषध वितरकाची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात तब्बल ३ कोटी ५४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार विश्रामबाग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे शहरातील औषध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. सदाशिव पेठेतील सिनिअर एजन्सीचे मालक दिनेश कर्नावट हे औषध वितरणाचा व्यवसाय करतात. आरोपी सोनाली लक्ष्मण गिरीगोसावी हिने सुरुवातीला त्यांच्या एजन्सीकडून रोखीने औषधे खरेदी केली. वेळेवर पैसे दिल्यामुळे तिने कर्नावट यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिने जयेश वसंत जैन याला




उधारीवर औषधे देण्याची विनंती केली आणि त्याचे पैसे आपण देणार असल्याचे सांगितले.

या विश्वासावर १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत आरोपींनी टप्प्याटप्प्याने मोठ्या प्रमाणात औषधे उचलली. एकूण ३ कोटी ५४ लाख ५५ हजार ३२९ रुपयांचा माल घेतल्यानंतरही त्याचे पैसे देण्यात आले नाहीत. वारंवार मागणी करूनही पैसे न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर कर्नावट यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, या दोघांविरुद्ध पुणे शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये आतापर्यंत चार गुन्हे दाखल झाले आहेत. या सर्व प्रकरणांमधील फसवणुकीची रक्कम १८ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे. न्यायालयाने या दोघांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले असले तरी आरोपी अद्याप फरार आहेत.

या प्रकरणाचा तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जानराव करत आहेत. औषध व्यवसायात अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटना वाढत असल्याने वितरकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून लवकरच त्यांना अटक होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुण्याचा नवा ‘कारभारी’ कोण?; महापौरपदासाठी हालचालींना वेग; आरक्षणाच्या सोडतीकडे लक्ष

**अश्लेषा मस्के**

पुणे, ता. १७ : पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दोन तृतीयांश बहुमतासह दणदणीत विजय मिळवत शहराच्या राजकारणावर आपली पकड अधिक मजबूत केली आहे. १६५ पैकी तब्बल ११९ जागा जिंकत भाजप पुण्यातील सर्वात प्रभावी राजकीय शक्ती म्हणून पुढे आला आहे. या निकालानंतर आता पुण्याचा पुढचा महापौर कोण होणार, याकडे संपूर्ण शहराचं लक्ष लागलं आहे.

पुणे महापालिकेच्या राजकारणात हा विजय ऐतिहासिक मानला जात आहे. महापालिका स्थापन झाल्यापासून अनेक वर्षे भाजपला विरोधी बाकांवर बसावं लागलं होतं. २०१७ मध्ये पहिल्यांदाच भाजपने स्वबळावर निवडणूक लढवली आणि ९७ जागांसह सत्ता मिळवली. मात्र त्या वेळी पालिकेतील अनुभव असलेले नगरसेवक कमी असल्यामुळे काही मोजक्या नेत्यांनाच महत्त्वाच्या पदांची संधी मिळाली होती.

पहिल्या टप्प्यात महापौरपदाची जबाबदारी मुक्त्या टिळक यांच्याकडे आली. पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या नेत्या म्हणून त्यांची ओळख होती. आजारपणामुळे त्यांना अनेकदा महापालिकेत प्रत्यक्ष उपस्थित राहता आलं नाही, तरीही त्यांनी आपल्या कार्यकाळात महापौरपदाची प्रतिष्ठा टिकवली. त्यानंतर मुरलीधर मोहोळ यांना महापौरपदाची संधी मिळाली. त्यांच्या कार्यकाळात करोनासारखी भीषण साथ आली आणि त्या काळात पुणेकरांसाठी आरोग्य सुविधा, विलगीकरण केंद्रे आणि प्रशासनाशी समन्वय साधत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आताच्या निवडणुकीत भाजपने केवळ सत्ता टिकवली नाही, तर ती अधिक मजबूत केली आहे. याउलट अजित पवार आणि शरद पवार गटांनी एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी उभारली होती. मोफत मेट्रो आणि बस प्रवासासारखी आकर्षक आश्वासने देऊनही पुणेकरांनी राष्ट्रवादीवर विश्वास ठेवला नाही. निकालातून स्पष्ट झालं की पुणेकरांनी स्थैर्य आणि ठोस नेतृत्वाला प्राधान्य दिलं आहे. या निकालानंतर महापौरपद भाजपकडे जाणार हे निश्चित असलं, तरी नेमकी संधी कोणाला मिळणार याबाबत मोठी उत्सुकता आहे. सध्या महापौरपदाचे आरक्षण जाहीर झालेलं नाही. आरक्षणाची सोडत पुढील दोन ते तीन आठवड्यांत निघण्याची शक्यता असून त्यानंतरच अधिकृत उमेदवार ठरेल. दरम्यान, भाजपमध्ये इच्छुकांची फौज तयार झाली आहे. शहराध्यक्ष धीरज घाटे, निवडणूक प्रमुख गणेश बिडकर, माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, वर्षा तापकीर, माजी उपमहापौर प्रसन्न जगताप, राजेंद्र शिळीमकर, मानसी देशपांडे, मंजूषा नागपुरे, अनिल टिंगरे, योगेश मुळीक यांच्यासह इतर पक्षांतून भाजपमध्ये आलेल्या बाळा ओसवाल, पृथ्वीराज सुतार, सचिन दोडके यांसारख्या नेत्यांनाही महापालिकेच्या कामकाजाचा अनुभव आहे.

सध्या महापौरपदासाठी तीन नावांची सर्वाधिक चर्चा आहे. गणेश बिडकर हे पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून यापूर्वीही नगरसेवक म्हणून त्यांनी काम केलं आहे. निकालापूर्वीच त्यांच्या नावाचे महापौरसाहेब असे उल्लेख असलेले बॅनर झळकले होते. दुसरं नाव राजेंद्र शिळीमकर यांचं आहे. माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांचे खंदे समर्थक म्हणून ते ओळखले जातात. तर तिसरं नाव आहे शहराध्यक्ष धीरज घाटे यांचं. सभागृह नेतेपदाचा अनुभव आणि संघटनात्मक ताकद त्यांच्या पाठीशी आहे.

# बाणेर–पाषाण–सुसमध्ये अमोल बालवडकरांचा धक्कादायक विजय

**पुणे, ता. १७ :** पुणे महापालिका निवडणुकीत भाजपने १०० हून अधिक जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवली आहे. शहरभर भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष सुरू असतानाच, रात्री उशिरा आलेल्या एका निकालाने भाजपला धक्का दिला आहे. प्रभाग क्रमांक ९ (बाणेरपाषाणसुस) येथून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अमोल बालवडकर यांनी शेवटच्या फेरीत विजय खेचून आणत भाजपचे उमेदवार लहू बालवडकर यांचा ९०३ मतांनी पराभव केला. याच प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेसचे दुसरे उमेदवार बाबुराव चांदेरे यांनीही विजय मिळवला आहे.



प्रभाग क्रमांक ९ मध्ये अमोल बालवडकर आणि लहू बालवडकर यांच्यात अत्यंत अटीतटीची लढत पाहायला मिळाली. आठव्या फेरीअखेर लहू बालवडकर यांची अमोल बालवडकर यांच्यावर १,१३५ मतांची आघाडी होती. मात्र नवव्या फेरीत अमोल बालवडकर यांनी आघाडी कमी करत निर्णायक आघात केला. निकालानंतर भाजपकडून फेरमतमोजणीची मागणी करण्यात आली, मात्र त्यातून कोणताही बदल झाला नाही. अखेर अंतिम निकालात अमोल बालवडकर यांनी ९०३ मतांच्या फरकाने विजय नोंदविला.

दरम्यान, विशेष म्हणजे, पुणे महापालिका निवडणुकीत भाजपने उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी अमोल बालवडकर यांचे तिकीट कापले होते. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेत शेवटच्या एका तासात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि घड्याळ चिन्हावरून निवडणूक लढवली. भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांच्याशी विधानसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या वादामुळेच उमेदवारी कापल्याची चर्चा होती. तर पक्षाकडून गुंडासोबतचा फोटो व्हायरल झाल्याने तिकीट कापण्यात आल्याचे कारण दिले गेले होते. अमोल बालवडकर यांचा विजय झाला असला तरी पुणे महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी एकूणच निराशाजनक ठरली आहे.

# लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून ॲड. अनिता गवळी निवडणूक लढविण्यास इच्छुक

## महिलांचे सक्षमीकरण, मूलभूत सुविधा व भ्रष्टाचारमुक्त कारभाराचा अजेंडा

**लोणी काळभोर, ता. १७ :** पुणे जिल्हा परिषद गट क्रमांक ४९ (लोणी काळभोरकदमवाकवस्ती) येथील २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी होणाऱ्या आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ॲड. अनिता सुर्यकांत गवळी यांनी निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवत जनसंपर्क वाढविला आहे. सामाजिक, धार्मिक, आरोग्य, देशकार्य व राजकीय क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असलेल्या ॲड. गवळी या थेट मतदारांशी संवाद साधत आहेत.

ॲड. अनिता गवळी यांनी बी.कॉम व एलएलबी असे शिक्षण घेतले असून त्या वकिली व्यवसायासोबत समाजकार्यातही सक्रिय आहेत. राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण समिती, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला विभाग तसेच विविध सामाजिक संस्थांमध्ये त्यांनी जबाबदारीची पदे सांभाळली आहेत. पुणे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी प्रभावी कामकाज केले आहे.

त्यांच्या कुटुंबाचा सामाजिक व राजकीय वारसा उल्लेखनीय आहे. त्यांचे पती सुर्यकांत गवळी यांनी राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्य केले असून लोणी काळभोर व कदमवाकवस्ती परिसरात ग्राहक



हक्क, सामाजिक प्रश्न व जनहिताच्या विषयांसाठी ते अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. देशकार्याच्या बाबतीतही त्यांच्या कुटुंबाची परंपरा आहे. भारतीय लष्करात सेवा दिलेल्या कुटुंबीयांचा वारसा, तसेच स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन व विविध राष्ट्रीय कार्यक्रमांमधील सक्रिय सहभाग त्यांच्या विचारसरणीचा पाया असल्याचे दिसून येते.

लोणी काळभोरकदमवाकवस्ती परिसरात शिक्षण, रस्ते, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, ग्राहक संरक्षण, कोरोना काळातील मदतकार्य तसेच विविध जनजागृती उपक्रमांमध्ये ॲड. गवळी दांपत्याने प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे. धार्मिक क्षेत्रात वारकरी संप्रदायाशी संबंधित उपक्रम, मंदिर स्वच्छता, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन व सामाजिक सलोखा जपण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे.

जिल्हा परिषदेमध्ये सामान्य नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, महिलांचे सक्षमीकरण, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे व पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी काम करणे हा माझा उद्देश आहे, असे ॲड. अनिता गवळी यांनी पुणे प्राईम न्यूज शी बोलताना सांगितले.

दरम्यान, गट क्रमांक ४९ मधील मतदारांमध्ये त्यांच्या कार्याची चर्चा सुरू असून आगामी जिल्हा परिषद निवडणूक चुरशीची ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

# दौंड येथील हॉटेल जगदंबा सिलिंडर स्फोटातील ५ कामगारांचा मृत्यू

**दौंड, ता. १७ :** पाटस मार्गावरील मांढरे मळा परिसरातील हॉटेल जगदंबामध्ये ७ जानेवारी रोजी घडलेला एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाला होता. या स्फोटात भाजलेल्या दहा कर्मचाऱ्यांपैकी पाच जणांचा मृत्यू झाला असून उर्वरितांवर अद्याप उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे हॉटेलमधील सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दौंड शहरापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या हॉटेल जगदंबामध्ये दुपारच्या सुमारास भटारखान्यात घरगुती वापराचा एलपीजी सिलिंडर फुटला. स्वयंपाक सुरू असतानाच अचानक मोठा आवाज झाला आणि आगीचा लोळ उठला. काही क्षणांतच संपूर्ण भटारखान्यात




आग पसरली. तेथे काम करणारे दहा कर्मचारी आगीच्या झळा बसून भाजले. स्फोट इतका तीव्र होता की हॉटेलच्या छपरावरील पत्रे उडाली आणि दर्शनी भागातील काचा तावदानासह खाली कोसळल्या. जखमी कर्मचाऱ्यांना स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने दौंडमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर अवस्थेतील सहा जणांना पुढील उपचारांसाठी पुण्यातील ससून रुग्णालयात हलवण्यात आले. त्यापैकी पाच जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ९० टक्क्यांहून अधिक भाजल्याने त्यांची प्रकृती अत्यंत नाजूक होती. काही दिवसांनी नातेवाइकांच्या विनंतीवरून सहा जखमींना आग्रा येथे हलवण्यात आले होते, मात्र त्यातील पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

तपासात असे समोर आले आहे की हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणावर सिलिंडरचा साठा होता. अग्निशामक विभागाने घटनास्थळी २१ सिलिंडर बाहेर काढले, त्यात १४ घरगुती आणि ७ व्यावसायिक वापराचे सिलिंडर होते. इतक्या मोठ्या प्रमाणात गॅस साठा असताना पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

दरम्यान, या दुर्घटनेने हॉटेल आणि ढाब्यांमधील गॅस सिलिंडरच्या वापराबाबत नियमांचे पालन होते की नाही, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने अशा आस्थापनांची तपासणी करून सुरक्षिततेचे नियम सक्तीने लागू करावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. कारण एका निष्काळजीपणामुळे पाच कुटुंबांचा आधार हिरावून गेला आहे.

# रांजणगाव परिसरात गुंगीकारक बंटा गोळ्यांचा साठा जप्त; ५७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**रांजणगाव, ता. १० :** रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजा मिश्रीत गुंगीकारक बंटा गोळ्यांचा साठा जप्त करत एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखा व रांजणगाव पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने शनिवारी (ता. १०) हि कामगिरी करीत तब्बल ५७ हजार ३५० रुपयांचा २०३ किलो ६०० ग्रॅम जप्त केला आहे. केंद्र शासनाच्या नशामुक्त भारत अभियान अंतर्गत पुणे ग्रामीण पोलिसांकडून हि मोठी कारवाई करण्यात आली आहे.

विपुल संदीप विटकर (वय २०, रा. रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.




याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार तुषार पंदारे यांनी सरकारतर्फ रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (ता. १०) स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रांजणगाव एमआयडीसी परिसरात गस्त घालत असताना, सरकारी दवाखान्याजवळ राहणारा विपुल विटकर हा त्याच्या राहत्या घरात व घराजवळील पानटपरीत गांजा मिश्रीत बंटा नावाच्या गुंगीकारक गोळ्या बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी साठवून ठेवल्याची गोपनीय माहिति हवालदार तुषार पंदारे यांना मिळाली.

माहितीच्या आधारे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून उपविभागीय पोलीस अधिकारी शिरूर यांची परवानगी घेण्यात आली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा व रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने पंचांसह छापा टाकला. छाप्यात आरोपीकडून २०३ किलो ६०० ग्रॅम वजनाच्या गांजा मिश्रित गुंगीकारक बंटा गोळ्या असा एकूण ५७ हजार ३५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच्यावर विविध कलमान्वये रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, रांजणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ, पोलीस अंमलदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजू जाधव, सागर धुमाळ, राजू मोमीण, राहुल पवार रांजणगाव पोलीस ठाण्यातील दत्तात्रय शिंदे, विजय सरजिने, विलास आंबेकर यांनी केली आहे. तपास उपनिरीक्षक अविनाश थोरात हे करत आहेत.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## हिवाळ्यात मुळा खाण्याचे आरोग्यवर्धक फायदे, जाणून घ्या

हिवाळा सुरु झाल्यावर बाजारात विविध पालेभाज्या दिसू लागतात. यामध्ये पांढराचुटूक मुळा आपले लक्ष वेधून घेतो. हिवाळ्यामध्ये मुबलक प्रमाणात मुळा खाण्याचे खूप फायदे आहेत. हिवाळ्यामध्ये घरामध्ये मुळ्यापासून विविध पदार्थ बनवले जातात. म्हणूनच मुळ्याला आरोग्याचा खजिना असे म्हटले जाते.

मुळा फायबरने समृद्ध असतो, त्यामुळे पचनक्रिया उत्तम होण्यास मदत होते. तसेच मुळा आहारात असल्याने, बद्धकोष्ठता दूर राहते. मुळा खाण्यामुळे आपले आतडे स्वच्छ आणि निरोगी राहते. तसेच पोट हलके राहण्यासही मदत मिळते.

मुळा व्हिटॅमिन सी ने समृद्ध असतो. त्यामुळे हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी मुळा खायलाच हवा. यामुळे हिवाळ्यातील आजारांवर मात करता येते. हिवाळ्याच्या सीझनमध्ये मुळा खाण्यामुळे सर्दी आणि फ्लूपासून रक्षण होते.

मुळा हा मधुमेहींसाठी संजीवनी मानला जातो. मुळ्यामध्ये असलेल्या संयुगांमुळे, शरीरातील इन्सुलिनची पातळी नियंत्रित राहते. तसेच मुळ्याचा ग्लायसेमिक इंडेक्स (GI) कमी असल्याकारणाने मधुमेहींसाठी हा एक उत्तम पर्यायही मानला जातो.

मुळ्यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण हे उत्तम असते. त्यामुळे रक्तवाहिन्यांनांसाठी अतिशय महत्त्वाचे मानले जाते. मुळ्यातील गुणां मुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत मिळते.

मुळ्यांमधील पाण्याचे प्रमाण आणि जीवनसत्त्वे त्वचेला मॉइश्चरायझ करतात. मुळा खाल्ल्याने त्वचा उजळण्यास आणि कोरडेपणा टाळण्यास मदत होते.

मुळा हे यकृत आणि पोटाच्या समस्यांसाठी एक नैसर्गिक उपाय मानला जातो. मुख्य म्हणजे मुळा हा कावीळच्या उपचारातही उपयुक्त ठरतो.

मुळ्यामध्ये कॅलरीजचे प्रमाण हे खूप कमी असते. मुख्य बाब म्हणजे मुळ्यात फायबर सर्वाधिक प्रमाणात असतात. त्यामुळे आपले पोट बराच काळ भरलेले राहते. यामुळे वजन कमी होण्यास मदत मिळते. मुळ्यात असणारे दाहक-विरोधी गुणधर्म शरीरातील सूज आणि सांधेदुखीपासून आराम देतात. मुळ्यामध्ये आयसोथायोसायनेट्स सारखी संयुगे असतात. यामुळे शरीरात कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्यास मदत होते.

## टोल नाकेपूर्णपणे कॅशलेस होणार

**पुणे, ता. १७ :** देशातील टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी केंद्र सरकारने एप्रिलपासून सर्व टोल प्लाझा पूर्णपणे कॅशलेस करण्याचा निर्णय घेतलाय. या नवीन नियमानुसार वाहनचालकांना केवळ फास्टॅग किंवा UPI द्वारेच टोल भरता येईल, रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही. केंद्रीय रस्ते वाहतूक सचिव व्ही. उमाशंकर यांनी या बदलाची माहिती दिली असून सध्या टोल नाक्यांवर याची प्रायोगिक तत्त्वावर चाचणी सुरू आहे. या निर्णयामुळे इंधनाची बचत, टोल वसुलीत पारदर्शकता आणि प्रवासाचा वेग वाढण्यास मदत होईल. भविष्यात फिजिकल बॅरियरमुक्त टोलिंग प्रणाली लागू करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात असून वाहनचालकांनी आपले फास्टॅग खाते सक्रिय ठेवणे आता अनिवार्य ठरेल.

# मराठी माणसाच्या पाठीशी आपल्याला ठाम उभं रहायचं

### खचून जाणाऱ्यातले आपण नाही; निकालानंतर राज ठाकरेंची भावुक पोस्ट

**मुंबई, ता. १७ :** राज्यभरात प्रचंड राजकीय प्रतिष्ठेच्या बनलेल्या, अत्यंत चुरशीने लढवल्या गेलेल्या महापालिका निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले. त्यामुळे राज्याच्या राजकारणावरील सत्ताधाऱ्यांचे वर्चस्व पुन्हा सिद्ध झाले. विशेषत: सत्ताधारी महायुतीचे नेतृत्व करणाऱ्या भाजपचे राजकीय स्थान आणखी भक्कम बनले. प्रमुख शहरांचा कारभार हाती येणार असल्याने महापालिका निवडणुकांना मोठे महत्व प्राप्त झाले.

मुंबई महापालिकेच्या म हापौरपदी पहिल्यांदाच भाजपचा महापौर बसणार आहे. फक्त इचउ च नाही, तर महाराष्ट्रातील २९ पैकी २५ महापालिका जिंकून भाजपने ठाकरे बंधुंसह संपूर्ण विरोधी पक्षाला हरवलं. महापालिका निवडणूक निकालाची सर्वात मोठी बाब म्हणजे २५ वर्षानंतर येथे शिवसेनेचा किल्ला ढासळला आहे. तर राज ठाकरे यांची मनसे दोन आकडी जागाही मिळवू शकली नाही.



या निकालानंतर राज ठाकरे यांनी निवडणूक ही सोपी नव्हती, असे म्हणत मनसैनिकांचे मनोबल वाढवले आहे. राज ठाकरे यांनी पोस्ट करत लिहिले की, सस्नेह जय महाराष्ट्र, सर्वप्रथम महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेच्या निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचं मनापासून अभिनंदन. यावेळची निवडणूक ही सोपी नव्हती. अचाट धनशक्ती, सत्तेची शक्ती विरुद्ध शिवशक्ती अशी लढाई होती. पण अशा लढाईत सुद्धा दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्तम झुंज दिली. त्याबद्दल त्यांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला यावेळेस अपेक्षित यश मिळालं नसलं याचं दुःख आहे, पण म्हणून खचून जाणाऱ्यातले आपण नाही. आपले जे नगसेवक निवडून आलेत ते तिथल्या तिथल्या सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील. आणि मराठी म णसाच्या विरोधात काही होत आहे असं दिसलं तर त्या सत्ताधाऱ्यांना जेरीस आणतील हे नक्की. आपली लढाई मराठी माणसाची, मराठी भाषेची , मराठी अस्मितेच्यासाठीची आणि समृद्ध महाराष्ट्रासाठीची लढाई आहे. ही लढाई हेच आपलं अस्तित्व आहे. अशा लढाया या दीर्घकालीन असतात याचं भान तुम्हा सगळ्यांना आहे. बाकी काय चुकलं, काय राहून गेलं, काय कमी पडलं आणि काय करावं लागेल याचं विश्लेषण आणि कृती आपण सगळे मिळून करूच.

मराठी माणसाच्या पाठीशी आपल्याला ठाम उभं रहायचं तुम्हाला खरं तर हे सांगण्याची गरज नाही. पण तरीही सांगतो एमएमआर परिसरात असो की एकूणच राज्यात मराठी माणसाला नागवण्याची एकही संधी सत्ताधारी आणि त्यांच्या आश्रयाला गेलेले सोडणार नाहीत. त्यामुळे आपल्या मराठी माणसाच्या पाठीशी आपल्याला ठाम उभं रहायचं आहे. निवडणुका येतील जातील पण आपला श्वास हा मराठी आहे हे विसरायचं नाही. लवकरच भेटूया. पुन्हा कामाला लागूया. नव्याने आपला पक्ष आणि संघटना उभारूया ! ! !, असा विश्वासही राज ठाकरे यांनी व्यक्त केला.



## पिंपरीत गुलालावर फटाक्याची ठिणगी पडल्याने टेम्पोला आग; ७ जण भाजले

**पिंपरी, ता. १७ :** महापालिका निवडणुकीतील विजयी उमेदवाराच्या विजयोत्सवात गुलाल उधळत असताना फटाक्याची ठिणगी पडून अचानक आगीचा भडका उडाल्याची घटना शुक्रवारी (ता. १६) सायंकाळी बावधनमधील पाटीलनगर परिसरात घडली. या घटनेत ७ जण ४ ते १७ टक्के भाजून किरकोळ जखमी झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बावधन येथील पाटीलनगरमधील आविष्कार डेअरीसमोरील रस्त्यावर हा प्रकार घडला. पुणे महापालिका निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार किरण दगडे यांचे अभिनंदन करण्यासाठी रितेश वाघमारे हे त्यांच्या बावधन येथील कार्यालयात आले होते. त्यावेळी कार्यालय परिसरात समर्थकांकडून गुलाल उधळून आणि फटाके फोडून जल्लोष सुरू होता. दगडे यांच्या कार्यालयापासून काही अंतरावर उभ्या असलेल्या एका टेम्पोवर गुलाल उधळला जात होता. त्याच वेळी जवळच आतिषबाजी सुरू असताना फटाक्याची एक ठिणगी टेम्पोच्या छतावर पडली. त्यातून अचानक आग लागून आगीचा भडका उडाला.

या घटनेत रितेश बळीराम वाघमरे, सूरज बिसले, आर्यन पिसोळे, तुषार लालझरे, रियांश शहा, सूरज आठवले आणि आदित्य पिसोळी हे सात जण भाजले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, अशाच प्रकारची घटना मागील महिन्यात जेजुरी येथेही घडली होती. नगरपरिषद निवडणूक निकालानंतर सुरू असलेल्या जल्लोषात आतिषबाजी व भंडाऱ्याच्या उधळणीदरम्यान आग लागून विजयी उमेदवारासह काही जण जखमी झाले होते. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे विजयोत्सवात सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# पुणे शहराचा चेहरामोहरा बदलणार; मुरलीधर मोहोळ यांची घोषणा

**पुणे, ता. १७ :** पुणेकरांनी भाजपला मोठ्या प्रमाणात पाठिंबा देत उमेदवार निवडून दिल्याबद्दल मी सर्व पुणेकरांचे मनापासून आभार मानतो. मतदान करताना पुणेकरांनी शहराच्या विकासाला, प्रगतीला आणि भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्याला प्राधान्य दिले. हीच भावना लक्षात घेऊन आम्ही सत्ता केवळ उपभोगण्यासाठी नव्हे, तर पुणेकरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी जबाबदारीने काम करू, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री व पुण्याचे निवडणूक प्रभारी मुरलीधर मोहोळ यांनी केले.

या वेळी मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



पत्रकारांशी बोलताना मोहोळ म्हणाले, की भाजपने जाहीरनाम्याच्या माध्यम ातून पुणेकरांसमोर मांडलेले संकल्पपत्र पूर्ण करण्याचे भान आम्हाला आहे. पुढील पाच वर्षांत विकासकामे, पायाभूत सुविधा आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत देशभरात झालेल्या विकासाचा परिणाम पुण्यातही स्पष्टपणे दिसून येतो. मेट्रो प्रकल्प, चांदणी चौकाचा विकास, तसेच विविध कामांसाठी मिळालेल्या निधीमुळे शहराचा चेहरामोहरा बदलला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पुण्याशी संबंधित अनेक प्रश्न शासनदरबारी मार्गी लावले.

मागील पाच वर्षांत महापालिकेत असताना भाजपने केलेली विकासकामे जनतेसमोर मांडली, तसेच मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०४७ पर्यंत पुण्याचा विकास कसा करायचा, याचे दूरदृष्टीपूर्ण व्हिजन नागरिकांसमोर ठेवण्यात आले. हे विचार पुणेकरांना पटल्याने त्यांनी पुन्हा भाजपवर विश्वास दाखवला, असे मोहोळ म्हणाले.

# ठाकरे बंधू आता एकत्रच असणार यात शंका नाही : संजय राऊत

**मुंबई, ता. १७ :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आता एकत्रच असणार यात शंका नाही, असे विधान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी केले. तसेच ठाण्यात अधिक लक्ष दिले असते तर निकाल वेगळा असू शकला असता असेही संजय राऊत म्हणाले. मुंबईतल्या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, मुंबईची सत्ता आमच्याकडे नाही याचा अर्थ लढाई संपली असा होत नाही. उलट सत्ता नसताना लढ्याला अधिक धार येते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात उतरलेला एकही पक्ष सत्तेत नव्हता, तरीही १०६ हुतात्म्यांनी बलिदान दिले.

मनसेबाबत बोलताना ते म्हणाले, राज ठाकरे यांनी मांडलेली भूमिका योग्य आहे. आम्ही हा पराभव मानत



नाही. मनसेला १०१२ जागा अपेक्षित होत्या. अनेक उमेदवार थोड्या मतांनी पडले. मुलुंड, भांडुप आणि इतर म तदारसंघांचा उल्लेख करत ते म्हणाले की, रिकाउंटिंगची संधी असूनही काही ठिकाणी त्याचा लाभ घेता आला नाही. ते पुढे म्हणाले, शिवसेना मुंबईतील मूळ पक्ष आहे. आधी आमच्याकडे ८४ जागा होत्या. यावेळी १५२० जागा कमी झाल्या. मनसेला सहा जागा मिळाल्या. अपेक्षा जास्त होत्या, पण निवडणुकांम ध्ये असे घडते. ठाण्याबाबत ते म्हणाले, आमचे लक्ष मुंबईवर अधिक होते. ठाण्यात अधिक लक्ष दिले असते तर निकाल वेगळा असू शकला असता. पण आता एक वर्तुळ पूर्ण झाले आहे. यापुढे एकनाथ शिंदे यांची घसरण सुरू होईल. एमआयएमबाबत बोलताना राऊत म्हणाले, त्यांचे स्वतंत्र राजकारण आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेले आहेत. संभाजीनगर, मुंबई आणि मालेगावमध्ये त्यांची ताकद वाढलेली दिसते. तसेच आगामी काळात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्रच राहणार, यात शंका नाही असेही संजय राऊत म्हणाले.

# विकासाच्या अजेंड्याला जनतेकडून प्रतिसाद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, ता. १७ :** भारतीय जनता पक्षाने मुंबईसह २९ महानगरपालिकां मध्ये जोरदार बॅटिंग करताना विजय साकारले आहेत. मुंबईमध्येही भाजपने सर्वाधिक जागांवर आघाडी किंवा विजय मिळवले आहेत. त्यामुळे या विजयाच्या विश्वासानंतर भाजपच्या सर्व नेत्यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व इतर नेत्यांनी मुंबईतील भाजप कार्यालयात जल्लोष केला.

जल्लोषानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कलांनूसार महानगरपालिकेत भाजप आणि महायुतीची सत्ता येणार असल्याचे दिसत आहे. सर्वांचे लक्ष लागलेल्या मुंबई महानगरपालिकेत जी काही वाटचाल सुरु आहे, त्यानूसार महायुतीलाच पूर्ण बहुमत मिळणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या निवडणूकीत आपण विकासाचा अजेंडा घेवून गेलो होतो, त्याच अजेंड्याला जनतेने भरभरुन प्रतिसाद दिला आहे. लोकांना विकास हवा आहे, त्यामुळेच त्यांनी आपल्याला निवडून दिले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास या विजयाने पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. या निमित्ताने मी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचेही स्मरण करतो, कारण त्यांचाही आशिर्वाद आपल्या पाठीशी होता, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, आमचा अजेंडा हा विकासाचाच असणार आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. आमचा विकासाचा आत्मा हा हिंदूत्वावादी आहे, त्यामुळे हिंदूत्व आणि विकास यांना वेगळे करता येणार नाही, असे म्हणताना त्यांनी ठाकरे बंधूंना टोला लगावला.

### विश्वासाला तडा देवू नका

यावेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांचे कौतूक करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी जबाबदारीची जाणीव देखील करुन दिली. ते म्हणाले की, जेवढे मोठे समर्थन मिळते, तेव्हा आपल्याला जबाबदारीचे भान देखील असणे अवश्यक आहे. लोकांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाणार नाही, याची तुम्ही दक्षता घ्या, असा मोलाचा सल्ला देखील फडणवीसांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला.

# पुणे महापालिकेत ६७ महिला विजयी

**पुणे, ता. १७ :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीत या वर्षी महिला उमेदवारांचा उल्लेखनीय दबदबा दिसून आला. यंदा भारतीय जनता पक्षाने (भाजप) ९२ महिला उमेदवारांना तिकीट दिले होते, त्यापैकी ६७ जण विजयी झाल्या. विरोधी पक्षांनी निवडलेल्या महिला उमेदवारांमधूनही जण निवडून आल्या. ही परिस्थिती राज्यात लाडक्या बहिणीच्या प्रचाराचा परिणाम आहे, ज्यामुळे महायुतीच्या सरकारला पुन्हा स्थिरता मिळाली.

महिला मतदारांचा वाढता दबदबा हे या निकालाचे मुख्य कारण मानले जात आहे. छत्रपती शिवाजीनगर



कॉलनी, वानवडी-साळुंखे विहार, शंकर महाराज मठ-बिबवेवाडी, काशेवाडी-डायसप्लॉट, रविवार पेठ-नाना पेठ, कसबा गणपती-कमला नेहरू हॉस्पिटल-केईएम हॉस्पिटल, शनिवार पेठ-महात्मा फुले मंडई, घोरपडे पेठ-गुरूवार पेठ-समता भूमी आणि डेक्कन जिमखाना हॅप्पी कॉलनी या प्रभागांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त असल्याने, या प्रभागांत महिलांनी विजय मिळवला.

पुणे महापालिकेत १६५ नगरसेवक आहेत आणि महिलांसाठी ८३ जागा आरक्षित आहेत. यामुळे प्रत्येक पक्षाला महिला उमेदवारांना विशेष प्राधान्य देणे आवश्यक झाले. भाजपने सर्वसाधारण गटात चार आणि अनुसूचित जाती गटात पाच महिला उमेदवारांना तिकीट दिले. या उमेदवारांमध्ये पल्लवी जावळे, विणा घोष, अर्चना जगताप, संगीता दांगट, रंजना टिळेकर आणि निवेदिता एकबोटे यांनी महिला आरक्षण नसलेल्या जागांवरही विजय मिळवला. कोंढवा बुद्रुक-येवलेवाडी प्रभागात भाजपने चार महिला उमेदवारांना संधी दिली. विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांच्या मातोश्री रंजना टिळेकर या प्रभागातून सर्वसाधारण प्रभागातून लढत आहेत. दरम्यान, राज्यात महिला मतदारांचे वजन आणि लाडक्या बहिणी यांचा प्रभाव आता निवडणुकांमध्ये स्पष्ट दिसतो आहे. ही घडामोड फक्त महापालिकेपुरती मर्यादित नाही तर भविष्यातील राजकारणासाठीही दिशा ठरवणार आहे, ज्यामुळे पक्षांनी महिलांसाठी अधिक संधी निर्माण केल्या आहेत.

## सहकारनगरमध्ये बंद फ्लॅट फोडून एक लाखांची रोकड लंपास; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पुणे, ता. १७ :** पुणे शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा घरफोडीची घटना उघडकीस आली आहे. सहकारनगर परिसरातील भरवस्तीत असलेल्या एका बंद फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल एक लाख रुपयांच्या रोख रकमेवर डल्ला मारला. या धाडसी चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.




याप्रकरणी संजय सदाशिव दिघे (वय ५५, रा. राजमुद्रा सोसायटी, धनकवडी) यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. १२ जानेवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दिघे हे घराबाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद फ्लॅटचे मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घराची झडती घेत चोरटे थेट बेडरूममध्ये गेले.

दिघे यांनी बेडरूममधील कपाटाच्या वरच्या मोकळ्या जागेत एका पिशवीत एक लाख रुपयांची रोख रक्कम ठेवली होती. चोरट्यांनी कपाट उघडून तपासणी केली असता ही पिशवी त्यांच्या हाती लागली. त्यानंतर पिशवीसह रोकड चोरून चोरटे घटनास्थळावरून पसार झाले. प्राथमिक तपासात घरातील इतर कोणत्याही वस्तूंची चोरी झाल्याचे आढळून आलेले नाही.

दिघे घरी परतल्यानंतर त्यांना मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश केल्यानंतर कपाट उघडे असून पैसे गायब असल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने सहकारनगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

सोसायटीत सुरक्षा रक्षक असतानाही घरफोडीची घटना घडल्याने रहिवाशांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस गस्त वाढवण्यात आली असतानाही अशा घटना घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून परिसरातील सराईत गुन्हेगारांची चौकशी सुरू असून चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.


# शिरसगाव काटा येथील महिला तलाठ्याला सात हजारांची लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहाथ पकडले

**शिरूर, ता. १७ :** माती विक्रीची तक्रार आली असून तुमच्या बाजूने पंचनामा करून देण्यासाठी शेतकऱ्याला १० हजार रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ७ हजार रुपये स्वीकारताना शिरसगाव काटा (ता. शिरूर) येथील ग्राम महसुल अधिकारी महिलेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. एसीबीने ही कारवाई नाव्हरा तळेगाव रस्त्यावरील छत्रपती संभाजीराजे चौकाजवळ गुरुवारी (ता.१६) केली आहे.

प्रमिला नागेश वानखेडे (वय ४२, पद- ग्राम महसूल अधिकारी, नेम. शिरसगाव काटा (वर्ग ३), रा. फ्लॅट नंबर ४०४ तक्षशिला सोसायटी, ए विंग, पठारे ठुबे नगर, खराडी) असे रंगेहाथ पकडण्यात आलेल्या महिला अधिकाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी एका ५६ वर्षीय शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांची शिरसगाव काटा येथे वडिलोपार्जित जमीन आहे. त्यांच्या वडीलांनी तोंडी वाटप करून भावंडाना जमीन दिली आहे. तक्रारदार हे त्यांच्या वाटणीस आलेल्या शेतीची लेवल करीत होते. तेव्हा त्यांच्या भावाने सदरची लेवल थांबवून वाटणीप्रमाणे रेकॉर्ड झाल्यावर तू लेवल कर व तुझा ऊसही नंतर तोडणी कर असे सांगितले होते. त्यावरून तक्रारदार यांनी सदरचे काम थांबवले होते.

दरम्यान, शिरसगाव काटागावच्या तलाठी प्रमिला वानखेडे या ९ जानेवारीला तक्रारदार यांच्या






शेतातील राहत्या घरी आल्या. आणि म्हणाल्या तुमच्या शेताचा पंचनामा करायचा आहे. तुम्ही माती विकत असल्याबाबत तक्रार आली आहे. तुम्ही तलाठी कार्यालयात येऊन भेटा असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे १२ जानेवारीला आरोपी लोकसेविका वानखेडे यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. तेव्हा वानखेडे यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुम्ही १० हजार रुपये द्या. तुमच्या बाजूने पंचनामा करते असे म्हणून तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली होती. याप्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, आरोपी लोकसेविका प्रतिभा नागेश वानखेडे यांनी तक्रारदारांच्या बाजूने शेतीचा पंचनामा करण्याकरता व इथून पुढे सहकार्य करण्याकरीता तडजोडीअंती ७ हजार रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छत्रपती संभाजीराजे चौकाजवळ गुरुवारी (ता.१६) सापळा रचला. तेव्हा लोकसेविका प्रतिभा वानखेडे यांना तक्रारदार यांच्याकडून ७ हजार रुपयांची लाच स्वीकारतानारंगेहाथ पकडण्यात आले आहे.

आरोपी लोकसेविका प्रतिभा वानखेडे यांच्याविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उप-अधीक्षक भारती मोरे करत आहेत.